# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### राज्यातील जिल्हा शासकीय रक्त केंद्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची पदे रद्द केल्याबाबत

**(१) ४५३१५ (११-१०-२०२२). श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा शासकीय रक्त केंद्रात गेल्या आठ वर्षांपासून १०९ कर्मचारी कंत्राटी स्वरुपात रुग्णांना सेवा देत होते परंतु राज्य रक्तसंक्रमण परिषदेने ही कंत्राटी पदे रद्द करण्याचा निर्णय घेतला असल्याने त्यांच्या मध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली असल्याची बाब दिनांक ४ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खासगी रक्तपेढीतून होणारी फसवणूक थांबविण्यासाठी शासकीय रक्त केंद्रातून जास्तीत जास्त रुग्णांना सेवा मिळावी याकरिता राज्य रक्तसंक्रमण परिषदेच्या वतीने जीवन अमृत सेवा योजना सुरु करण्यात आली तथापि रक्तसंक्रमण परिषदेने जीवन अमृत सेवा योजना बंद करून दिनांक ३१ मार्च,२०२२ रोजी वा त्यासुमारास कंत्राटी पदे रद्द करण्याचे आदेश काढले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कंत्राटी कर्मचा-यांना इतर सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१६-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे,

राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या ३७ व्या नियामक मंडळाच्या दिनांक १५.०२.२०१८ व ३८ व्या नियामक मंडळाच्या दिनांक १८.०५.२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये, ब्लड ऑन कॉल- जीवन अमृत सेवा योजनेचा आढावा घेण्यात आला होता. सदर आढाव्यामध्ये असे आढळून आले की, बहुतांशी जिल्हयांमध्ये या योजनेला अत्यल्प प्रतिसाद होता. शासनाने योजनेमध्ये सुधारणा केल्यानंतर देखील योजनेच्या कामगिरीमध्ये सुधारणा आढळून आलेली नाही. सदर बाब विचारात घेता, राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या नियामक मंडळाच्या बैठकीत व शासनामार्फत याबाबत सविस्तर विचार करून योजना आर्थिकदृष्टया व्यवहार्य नसल्याने सदरची योजना दिनांक ३१.०३.२०२२ पासून बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) संबंधित कमी करण्यात आलेले कर्मचारी नवीन योजनेअंतर्गत रिक्त जागेची जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर पात्रतेनुसार ते अर्ज करून शकतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौ. वाटुळ (ता.राजापूर,जि.रत्नागिरी) येथे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याबाबत

**(२) ४६१९८ (११-१०-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) :**सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ. वाटुळ (ता.राजापूर,जि.रत्नागिरी) येथे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे,हे खरे आहे काय,

वि.स. २४७ (2)

(२) असल्यास, ठाणे जिल्हयांमध्ये सुपर मल्टिस्पेशालिटी रुग्णालयास मंजूरी देण्यात आली असून त्याचधर्तीवर मौ. वाटुळ येथे उपजिल्हा रुग्णालय होण्याच्या अनुषंगाने शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनीजिल्हा शल्य चिकित्सक, .रत्नागिरी यांच्याकडे पत्रव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्तावावर कधीपर्यत कार्यवाही होणे अपेक्षित आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२१-०४-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) आरोग्य सेवा आयुक्तालयाकडून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त होताच पूढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्धवत नाही

(५) प्रश्न उद्धवत नाही

---

## वनोजा (ता.राळेगाव जि.यवतमाळ) येथील मंजूर प्राथमिक उपकेंद्राच्या बांधकामा करिता निधी उपलब्ध करणेबाबत

**(३) ४८३३० (०४-११-२०२२). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वनोजा,जागजई,उंदरी,सरई (ता.राळेगाव जि.यवतमाळ) या गावातील नागरीकांना आरोग्याच्या सुविधा मिळण्यासाठी वनोजा येथे सन २०१९ मध्ये प्राथमिक आरोग्य उपकेंद्र मंजूर करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरीता ग्रामपंचायतने १०००० चौ.फु. जागा उपलब्ध करूनही अद्यापपर्यंत सदर उपकेद्रांचे बांधकाम करण्यात आले नसल्याचे दिनाक ११ जून,२०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चोकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदर मंजुर आरोग्य उपकेंद्राच्या बांधकामास निधी उपलब्ध करुन बांधकाम त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (३०-०१-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय दि.१७.०१.२०१३ अन्वये वनोजा ता. राळेगाव जि. यवतमाळ येथे उपकेंद्र मंजूर करण्यात आले आहे.

(२) व (३) ग्रामपंचायत वनोजा यांच्या ठराव दि. २१.१२.२०२१ अन्वये सदर उपकेंद्र बांधकामासाठी ग्रामपंचायतीच्या मालकीचे १०००० चौ फुट जागा उपलब्ध करुन देण्याबाबत ग्रामपंचायतीने ठराव मंजूर केला आहे.

त्यानुसार सन २०२२-२३ या वर्षात जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधुन सदर उपकेंद्र बांधकामाकरिता निधीची मागणी करण्यात आली होती. तथापि दायित्व मागणी व सन २०२२-२३ करिताच्या प्रस्तावित कामांना निधी अपुरा पडत असल्यामुळे सदर उपकेंद्रास निधी उपलब्ध झाला नाही.

(४) सन २०२२-२३ या वर्षात केंद्रशासनाचे पत्र दि. ०६.०९.२०२२ अन्वये १५ व्या वित्त आयोगातुन आरोग्य संस्था बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये यवतमाळ जिल्हयातील उपकेंद्र १) सुकळी (जहागिंर), ता. उमरखेड, २) उपकेंद्र घोटी ता. कळंब ३) तेलंगटागळी ता. पांढरकवढा या ०३ उपकेंद्राचा समावेश आहे. तथापि उपरोक्त तीन्ही संस्थेपैकी ०१ ची इमारत सुस्थितीत असुन ०२ उपकेंद्रास डीपीडीसी मधुन निधी प्राप्त झाला असल्याने सदर संस्थाऐवजी यवतमाळ जिल्हयातील इतर पर्यायी ०३ उपकेंद्रास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत आयुक्त, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्याकडे प्रस्तावित केले आहे. यामध्ये उपकेंद्र वनोजा ता. राळेगाव यांचा समावेश आहे.

(५) कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यात बालविवाहाचे प्रमाण रोखण्यासाठी करावयाच्या उपायोजना**

**(४) ५३८०९ (२१-०१-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार राज्यात सन २०१९-२० मध्ये १८ वर्षाखालील मुलांच्या लग्नाचे प्रमाण २१९ टक्के, तर २१ वर्षाखालील मुलांच्या लग्नाचे प्रमाण १०.५ टक्के असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशाच्या मानाने राज्यात मुलींच्या बालविवाहाचे प्रमाण २३.३ टक्के तर मुलांच्या बालविवाहाचे प्रमाण १७.७ टक्केअसून शहरी व ग्रामीण भागातील राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण ५ नुसार राज्यात उस्मानाबाद, औरंगाबाद, अहमदनगर, लातूर, नंदुरबार, पुण्यात बालविवाहाचे प्रमाण सर्वाधिक असून कुटुंब आरोग्य सर्वेक्षण ४ ची तुलना करता ही आकडेवारी कमी असली तरी त्याचे मुलांच्या मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्यावर होणारे परिणाम गंभीर असल्याची माहिती आरोग्यतज्ञही देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली व करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (११-०३-२०२४) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण ४ व ५ नुसार राज्यातील १८ वर्षाखालील मुलींच्या लग्नाचे प्रमाण २१.९ टक्के, तर २१ वर्षाखालील मुलांच्या लग्नाचे प्रमाण १०.५ टक्के असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे ही खरे आहे.

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण ४ व ५ नुसार देशातील मुलींच्या बालविवाहाचे प्रमाण २३.३% असून राज्यातील प्रमाण हे २१.९% आहे. त्याचप्रमाणे देशातील मुलांच्या बालविवाहाचे प्रमाण १७.७% असून राज्यातील प्रमाण हे १०.५% एवढे आहे. त्याबाबतची सदर जिल्हयांची माहिती खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | सर्वे | जिल्हा |
|---|---|---|
| १ | राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण४ | औरंगाबाद ४६.२ |
| २ | | अहमदनगर ३८.७ |
| ३ | | लातूर ३७.१ |
| ४ | | पुणे २४.५ |
| ५ | | नंदूरबार २३.२ |
| ६ | | उस्मानाबाद ३१.१ |
| १ | राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण ५ | औरंगाबाद ३५.८ |
| २ | | अहमदनगर २६.९ |
| ३ | | लातूर ३१ |
| ४ | | पुणे २४ |
| ५ | | नंदूरबार २४ |
| ६ | | उस्मानाबाद ३६.६ |

(३) महिला व बालविकास विभागाच्या बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ अंतर्गत राज्यातील बालविवाह निर्मूलनाची कार्यवाही करण्यात येते. त्यामध्ये ग्रामीण, जिल्हा व विभागस्तरावर अधिका-यांची नियुक्ती करुन राज्यात होणारे बालविवाह रोखण्याची कार्यवाही तसेच अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येते. महिला बाल विकास व युनिसेफ मिळून विविध कार्यक्रम राबवून बालविवाह रोखण्यासाठी एकत्रितरित्या काम करतात. मागील पाच

वर्षात ३६ जिल्ह्यांमध्ये २७०७ बालविवाह रोखण्यात आलेले आहेत. बालविवाह प्रथा रोखण्यासाठी राज्यातील अनेक स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेळघाट (जि.अमरावती) येथे कुपोषणामुळे मृत्यू पावलेल्या बालकांच्या आकडेवारीमध्ये तफावत असल्याबाबत**

**(५) ५७७४९ (२८-०४-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (जि.अमरावती) येथे कुपोषणामुळे मृत्यू पावलेल्या बालकांच्या आकडेवारीमध्ये मोठया प्रमाणात तफावत असल्याचे माहे ऑगस्ट,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार या प्रकरणात दोषी आढळून येणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२७-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.

एकूण मृत्यू पावलेल्या बालकांच्या आकडेवारी मध्ये तफावत नाही. तथापि ० ते १ वयोगटातील बालमृत्यू पुढील कारणांमुळे झालेले आहेत.

(१) जन्मत: कमी वजन व प्री-मॅच्युरिटी, (२) हायपोग्लायसेमीया (३) ॲस्पिरेशनल/बर्थ/मिल्क ॲस्फीक्झिया, (४) जन्मजात विकृती, (५) न्युओनॅटल जॉडीस, (६) फेब्राईल कनवलजन्स, (७) न्युमोनिया, (८) जंतुसंसर्ग, (९) कनवलजन्स (१०) SIDS, (११) हृदय रोग, (१२) एमआरसीपी, (१३) ARDS, (१४) अब्डॉमिनल डीस्टेंशन, (१५) अज्ञात दंश, (१६) सर्पदंश, (१७) एनसेफॅलायटीस, (१८) कॅन्सर, (१९) मेनिंगोमायलोसील, (२०) सेरेब्रल पाल्सी, (२१) फायब्रॉटीक गॉलं ब्लॅडर, (२२) HIE WITH RDS

(२) व (३) होय, संबंधित अधिकाऱ्यांना कडक शब्दात समज देण्यात आली आहे.

(४) कार्यवाही सुरू आहे.

---

**जळगाव जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्ग बायोमेडिकेल वेस्ट आणि सर्जीकल या साहित्याची केलेल्या खरेदीसंदर्भात**

**(६) ६४९४६ (२८-०८-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत बायोमेडिकेल वेस्ट आणि सर्जीकल या साहित्यांची गेल्या आर्थिक वर्षात एकाच फर्म कडून मोठया प्रमाणात खरेदी करण्यात आल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी जिल्हा आरोग्य अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा परिषद जळगाव यांनी सन २०२१-२०२२ मध्ये लेखापरिक्षणाच्या आक्षेपावर कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदरहू संबंधीत दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२७-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात समवर्ति व वैधानिक लेखापरिक्षण पूर्ण करण्यात आलेले आहेत. त्यानूसार समवर्ति लेखापरिक्षण अहवालात एकूण ९५ व वैधानिक लेखापरिक्षण अहवालात एकूण ४४ आक्षेप बायोमेडिकल वेस्ट आणि सर्जिकल साहित्य खरेदी संदर्भातील आहेत. त्यानूसार सदर आक्षेपावर वेळोवेळी जिल्हास्तरावरून पूर्तता करण्यासाठी संबंधितांना योग्य त्या कार्यवाहीस्तव सुचना देवून व वेळीवेळी आक्षेप पूर्तता मेळाव्याचे आयोजन करून समवर्ति लेखापरिक्षण अहवालातील एकूण ८६ आक्षेप निकाली काढण्यात आलेले आहेत.

(३) त्रिसदस्यीय चौकशी समितीमार्फत प्राथमिक अहवाल प्राप्त झालेला आहे. चौकशीच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात हिपेटायटिस आजाराचा धोका संसर्ग नियंत्रणात आणण्यासाठी करावयाची उपाययोजना**

**(७) ६९३८४ (२८-०८-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी):** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीय विषाणू हिपेटायटिस नियंत्रण कार्यक्रमानुसार सन २०२१-२२ आणि आणि २०२२-२३ या वर्षात आतापर्यंत एकूण २,६६५ हिपेटायटिस रुग्ण निदर्शनास आले असल्याने या आजाराचा धोका दिवसेंदिवस वाढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी हिपेटायटिस बी आणि सी हे दोन प्रकार सर्वात घातक आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने आढावा घेवून सदर आजाराचा संसर्ग नियंत्रणात आणण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-१०-२०२३) :** (१) होय.

राष्ट्रीय व्हायरल हिपॅटायटीस नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सन २०२१-२२ आणि सन २०२२-२३ या वर्षामध्ये हिपॅटायटीस B ची रुग्णसंख्या २४७० व हिपॅटायटीस C ची रुग्णसंख्या ६८९ असे एकूण हिपॅटायटीस B व C ची रुग्णसंख्या ३१५९ आहे.

(२) होय.

(३) सद्यस्थितीत राष्ट्रीय व्हायरल हिपॅटायटीस नियंत्रण कार्यक्रमांतर्गत हिपॅटायटीसचे निदान व उपचार करण्यासाठी प्रत्येक जिल्हयात एक उपचार केंद्र चालू करण्यात आले आहे. तसेच राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमामध्ये हिपॅटायटीस बी चा धोका टाळण्यासाठी हिपॅटायटीस बी लसीचा समावेश करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीरामपूर (जि.अहमदनगर) येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या पहिल्या मजल्याचे व कर्मचारी निवासस्थान बांधकाम करण्यास प्रशासकीय मान्यता व निधी मिळणेबाबत**

**(८) ७१६२८ (२९-०२-२०२४). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (जि.अहमदनगर) येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या पहिल्या मजल्याचे व कर्मचारी निवासस्थान बांधकाम करणे याबाबतचे अंदाजपत्रक व आराखडे यास प्रशासकीय मान्यता व निधी मिळणे बाबत उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांनी सहसंचालक, आरोग्यसेवा रुग्णालय (राज्यस्तर), मुंबई यांच्याकडे दिनांक १६ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

वि.स. २४७ (6)

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावास दीड वर्षापेक्षा अधिक काळ होऊनही अद्याप प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रस्तावास मान्यता व निधी उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२६-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) श्रीरामपूर जि. अहमदनगर येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालय इमारत व निवासस्थान बांधकामाचे रु.१२९३.१६ लक्ष इतक्या किंमतीचे सुधारित अंदाज व आराखडयाचा प्रस्ताव शासनास प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेसाठी प्राप्त झाला असून आयुक्त, आरोग्य सेवा यांना दिनांक ०७.०३.२०२४ अन्वये त्रुटींची पुर्तता करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील रक्तपेढ्यांनी रुग्णांकडून रक्तासाठी निश्चित दरापेक्षा अधिक दर आकारल्याबाबत**

**(९) ७१६८४ (०५-०३-२०२४). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेकडून निश्चित केलेल्या दरानुसारच रक्तपेढ्यांमध्ये मिळणारे रक्त व त्याच्या घटकांची विक्री रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना करणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४ ते सन २०१९ या सहा वर्षांमध्ये मुंबईसह राज्यातील रक्तपेढ्यांनी रुग्णांकडून रक्तासाठी निश्चित दरापेक्षा अधिक दर आकारुन जवळपास रुपये १४ कोटी ७० लाख किंवा त्यापेक्षा अधिक रक्कमेचा अपहार केला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, पुणे,पिंपरी चिंचवड शहरातील रक्तपेढयांमध्ये शासनाने दिनांक ८ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास जारी केलेल्या सुधारित सेवा शुल्क नियमांचे उल्लंघन करुन रक्तघटक जादा दराने विक्री होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१६-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

दि.०१.०७.२०१४ ते ३१.१२.२०१८ या कालावधीत मुंबईतील १८ रक्तकेंद्रांनी रक्त व रक्त घटकांसाठी रुग्णांना जादा प्रक्रिया शुल्क आकारले असे निदर्शनास आले. सदर रक्तकेंद्राची तपासणी करुन व सनदी लेखापालाकडून (CA) अंकेक्षण केल्यानंतर जादा प्रक्रिया शुल्काच्या २० टक्के एवढा दंड आकारण्यात आला.

(३) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालय, औंध, पुणे व अन्न व औषध प्रशासन, पुणे यांनी कळविल्याप्रमाणे अशा प्रकारची लेखी तक्रार किंवा घटना निदर्शनास आलेली नाही.

(४) मुंबईतील दोषी असणाऱ्या १८ रक्तकेंद्रांवर रक्त व रक्त घटकांसाठी रुग्णांना जादा प्रक्रिया शुल्क आकारल्याने सनदी लेखापालाकडून (CA) अंकेक्षण केल्यानंतर जादा प्रक्रिया शुल्काच्या २० टक्के एवढा दंड रु.२,१०,२६,९४२/- (रु.दोन कोटी दहा लाख सव्वीस हजार नऊशे बेचाळीस फक्त ) वसुल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**मौ.सोनगीर (ता. जि. धुळे) येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१०) ७१७०७ (०१-०३-२०२४). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ.सोनगीर (ता. जि. धुळे) येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून ३० खाटांची क्षमता ५० खाटांपर्यंत वाढविण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालयात पूर्णवेळ अधीक्षक व दोन महिन्यांपासून एक्स-रे टेक्निशियनसह, फार्मासिस्ट उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार सदर रुग्णालयाचे श्रेणीवर्धन व रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२६-०३-२०२४) :** (१) नाही.
(२) होय.
(३) (i) सोनगीर (ता. जि. धुळे) चा श्रेणीवर्धनाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.
(II) जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील रिक्त पदे पदोन्नती व नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही शासनस्तरावरुन सुरु आहे.
तसेच गट "क" व "ड" मधील रिक्त पदे मे. टीसीएस आयओएन या एजन्सी मार्फत ऑनलाईन पध्दतीने निवड करण्याची प्रक्रिया सुरु असून ती अंतिम टप्प्यात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कुपोषित बालकांची समस्या सोडविण्यासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(११) ७२१८८ (०१-०३-२०२४). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील शहापूर, डोळखांबसह विविध ठिकाणी १०९ बालके तीव्र कुपोषित तर १२४१ बालके मध्यम कुपोषित असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, सातारा जिल्ह्यात महिला व बालकल्याण विभागामार्फत कुपोषणमुक्तीसाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत असल्या तरी १७८ बालके (सॅम) अतितीव्र कुपोषित आणि १५१४ बालके तीव्र स्वरुपाची कमी वजनाची असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कुपोषणाला आळा घालण्यासाठी बालकांच्या संगोपनाची सर्व माहिती पोषण ट्रॅकर ॲपद्वारे प्रशासन व शासनास पोहचवली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील कुपोषित बालकांची समस्या सोडविण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. २४७ (8)

**कुमारी आदिती तटकरे (०८-०५-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे ऑगस्ट २०२३ च्या मासिक प्रगती अहवालानुसार ठाणे जिल्हयातील कुपोषणाचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

| **एकूण वजन घेतलेली बालके** | **सर्वसाधारण बालके** | **मध्यम कमी वजनाची बालके** | **तीव्र कमी वजनाची बालके** |
|---|---|---|---|
| २३५५४७ | २१४३६० | १८५८९ | २५९८ |

शहापूर व डोळखांब प्रकल्पाचे कुपोषणाचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

| **प्रकल्पाचे नाव** | **एकूण वजन घेतलेली बालके** | **सर्वसाधारण बालके** | **मध्यम कमी वजनाची बालके** | **तीव्र कमी वजनाची बालके** |
|---|---|---|---|---|
| शहापूर | १३७०५ | १०९३६ | २२६४ | ५०५ |
| डोळखांब | ११११४२ | ८६७२ | १९६४ | ५०६ |

(२) मासिक प्रगती अहवालानुसार सातारा जिल्हयातील कुपोषणाची स्थिती खालीलप्रमाणे आहे

| **एकूण वजन घेतलेली बालके** | **सर्वसाधारण बालके** | **मध्यम कमी वजनाची बालके** | **तीव्र कमी वजनाची बालके** |
|---|---|---|---|
| १४९९०३ | १४३९८९ | ५०९४ | ८२० |

(३) होय हे खरे आहे.

(४) कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने खालील उपाययोजना करण्यात येतात.

१) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालकांना, गरोदर महिला, स्तनदा मातांना THR व ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२) आदिवासी प्रकल्पामध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु आहे. सदर योजनेंतर्गत गरोदर महिला व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवडयातून ४ दिवस अंडी / केळी देण्यात येते. या ४ दिवसांमध्ये शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी व मांसाहारी बालकांसाठी १ अंडे देण्यात येते.

३) राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बाल विकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरिक्त आहार व आरोग्य खात्यामार्फत औषधोपचार करण्यात येतात.

(४) राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन (ILA) समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICT-RTM) व जन आंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंगणवाडयांचे भाडे वेळेत देण्याबाबत

**(१२) ७२२६५ (२९-०२-२०२४). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालकल्याण विभागाने दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास काढलेल्या शासन निर्णय क्रमांक:एबावी-२०१५/प्र.क्र.३०७/का.६ नुसार राज्यातील नागरी व ग्रामीण/आदिवासी भागातील अंगणवाडयांच्या जागा भाडयात वाढ करून ते ग्रामीण/आदिवासी क्षेत्रात १ हजार रुपये, नागरी क्षेत्रात ४ हजार रुपये, तर महानगर क्षेत्रात ६ हजार रुपये करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील सुमारे एका वर्षापासून नागरी भागातील अंगणवाडयांना भाडे दिले गेले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

वि.स. २४७ (9)

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (०३-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.

तथापि, केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे अंगणवाडी केंद्र इमारतीच्या भाडेवाढी संदर्भात शासन निर्णय दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ अन्वये आणखी वाढ करण्यात आली असून सदर वाढ सन २०२३-२४ या आर्थिक वर्षापासून लागू करण्यात आली आहे. त्यानुसार अंगणवाडी केंद्रांचे प्रतिमाह सुधारित भाडेदर खालीलप्रमाणे आहेत.:-

ग्रामीण / आदिवासी क्षेत्र:- रु.२०००/-

नागरी क्षेत्र (महानगर वगळून):- रु.६०००/-

महानगर:- रु.८०००/-

(२) हे खरे नाही.

(३) राज्यातील नागरी भागातील अंगणवाडी केंद्र इमारतीचे भाडे अदा करण्याकरिता त्याबाबतचे प्रस्ताव संबंधित विभागीय उपायुक्त (महिला व बाल विकास) यांचेकडून एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयाकडे प्राप्त होतात. प्राप्त प्रस्तावानुसार संबंधित प्रकल्पांना अदा करावयाच्या अंगणवाडी भाडयाची रक्कम विचारात घेऊन SNA अंतर्गत वित्तीय मर्यादा निर्धारित करुन भाडे अदा केले जाते. त्यानुसार सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील अंगणवाडी केंद्र भाडे अदा करण्याकरिता निधीच्या उपलब्धतेनुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड शहरात उर्दूभाषिक वस्त्यांमध्ये उर्दू भाषेची माहिती असणा-या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची भरती करण्याबाबत

**(१३) ७२५४२ (२१-०२-२०२४). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उर्दू भाषिक वस्त्यांमध्ये उर्दू भाषेची माहिती असणा-या अंगणवाडी सेविका, मदतनीस यांची भरती केली जावी असे निर्देश शासनाच्या दिनांक २ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या अध्यादेशात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या नांदेड शहरातील अनेक उर्दू भाषिक वस्त्यांमध्ये अंगणवाडी सेविका, मदतनीस यांची भरती करताना सदरील अध्यादेशाची अंमलबजावणी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर पदभरती रद्द करुन या उर्दू भाषिक वस्त्यांमध्ये उर्दू भाषेची माहिती असणा-या अंगणवाडी सेविका,मदतनीस यांची भरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास ,विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (०३-०४-२०२४) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांच्या नियुक्तीच्या अटी शर्ती शासन निर्णय दिनांक २ फ़ेब्रुवारी,२०२३ अन्वये विहित करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. २ (इ) मध्ये ज्या अंगणवाडी / मिनी अंगणवाडी केंद्राकरीता अंगणवाडी सेविकेची / मदतनीसची / मिनी अंगणवाडी सेविकेची नियुक्ती करावयाची आहे, अशा अंगणवाडीमध्ये ५०% पेक्षा जास्त मुले मराठी भाषा व्यतिरिक्त इतर भाषा (उदा. उर्दू, हिंदी, माडिया, गोड, कोकणी, पावरी, कन्नड, कोरकू, तेलगू, भिल्लोरी, बंजारा इत्यादी पैकी एक भाषा) बोलणारी असतील तर तेथील अंगणवाडीमध्ये सेविका / मदतनीस / मिनी अंगणवाडी सेविका यांच्या पदावर सदर भाषेचे ज्ञान असलेल्या (लिहिता व वाचता येणे) उमेदवाराची नियुक्ती करण्यात यावी अशी तरतूद विहित करण्यात आली आहे.

शासन निर्णय दिनांक २ फ़ेब्रुवारी,२०२३ मधील तरतूद विचारात घेऊन ५० टक्के पेक्षा जास्त मुलांना हिंदी भाषा येत असल्याचे अंगणवाडी सेविका यांनी सादर केलेल्या अहवालानुसार संबंधित अंगणवाडी केंद्रामध्ये हिंदी भाषिक अंगणवाडी मदतनीस यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील पिपरीया. काचुरवाही व चाचेर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्याबाबत**

**(१४) ७२५९४ (०६-०३-२०२४). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिपरीया (ता.रामटेक, जि.नागपूर) हे आदिवासी बहुल भागातील गाव असून त्याठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांना विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोग्य सेवा आयुक्तालयामार्फत प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांना पत्र पाठविण्यात आले असून शासनास अद्यापपर्यंत प्रस्ताव सादर करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, काचुरवाही (ता.रामटेक) व चाचेर (ता.मौदा) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उपलब्ध नसल्याने गावातील नागरिकांना उपचाराकरिता इतरत्र जावे लागत असल्याने या गावांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांना विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०६-०६-२०२४) :** (१) होय.
(२) हे खरे आहे.
शासन निर्णय दि.०१/०१/१९९६ व आयुक्तालयाचे परिपत्रक दि.१५/०७/२०१७ अन्वये आरोग्य संस्था स्थापनेचे निकष निश्चित करण्यात आलेले असून त्यानुसार आरोग्य समिती/ जि.प. सर्वसाधारण सभा व जिल्हा नियोजन समिती सभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हा नियोजन समितीची मंजूरी घेण्याची कार्यवाही जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेस्तरावर सुरू आहे.
(३) होय.
(४) पिपरीया (ता.रामटेक, जि.नागपूर) तसेच काचुरवाही (ता.रामटेक) व चाचेर (ता.मौदा) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, आरोग्य सेवा यांचेकडुन शासनास प्राप्त होताच निकषात बसत असल्यास पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील जिल्हा रुग्णालय व मनकपूर येथील जिल्हा रुग्णालयाच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(१५) ७२७१३ (०६-०३-२०२४). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.अनिल देशमुख (काटोल), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील जिल्हा रुग्णालयाच्या बांधकामाला सन २०१६ मध्ये मंजुरी दिली असतानाही आजमितीस सदरहू रुग्णालयाचे बांधकाम निधी अभावी प्रलंबित असून सदरहू रुग्णालयातील अतिरिक्त ४०० खाटांचे रुग्णालय,

अग्निसुरक्षा, मॉडयुलर ओ.टी. रॅम्प आणि शवविच्छेदन गृहाच्या कामासाठी रुपये ४४ कोटी इतक्या रकमेचा निधीचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तर्फे या परिसरात मंजूर करण्यात आलेले ४० खाटांचे नेत्र रुग्णालयांचे काम देखील प्रलंबित राहिल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच नागपूर येथील मानकापुर परिसरात आरोग्य विभागाच्या वतीने १०० खाटांचे जिल्हा रुग्णालय सन २०१२-१३ मध्ये प्रस्ताव तयार करुन सन २०१६ मंजुर करण्यात आले असून १६ कोटी रुपये मंजुर करुन दिनांक २ मे, २०१८ रोजी पासुन मानकापुर येथील मनोरुग्णालय व क्रीडा संकुल यामधील जागेमध्ये १०० खाटांच्या रुग्णालयाचे बांधकाम करण्यात सुरुवात करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर काम २४ महिन्यात पुर्ण करावे असा शासन निर्णय असतानाअद्यापर्यंत काम पुर्ण झाले नसल्याने यानंतरही या कामास किंमती ३ कोटीची वाढ झाली असून नंतर फायर सेफटी, मॉड्युलर ओटी,रॅम्प व शवविच्छेदन गृहाच्या कामासाठी ४४ कोटी रुपयाचा संशोधीत प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर रुग्णालयाच्या बांधकामासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०६-०६-२०२४) :** (१) नाही.

१०० खाटांच्या जिल्हा रुग्णालय आणि जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय बांधकामाच्या रु. ४४३६.८३ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रक व आराखडयास शासन निर्णय दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ अन्वये सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच अतिरिक्त ४०० खाटांचे रुग्णालय मंजूरीबाबतचा प्रस्ताव शासनास अद्याप प्राप्त नाही

(२) नाही.

सद्य:स्थितीत डागा रुग्णालय परिसरात नेत्र रुग्णालय कार्यान्वित असून त्यांचे मार्फत जिल्हयातील सर्व नेत्र रुग्णांना सुरळित सेवा व नेत्र शस्त्रक्रिया सुरु आहे.

(३) होय.

(४) होय.

(५) १०० खाटांच्या जिल्हा रुग्णालय आणि जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय बांधकामाच्या रु. ४४३६.८३ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रक व आराखडयास शासन निर्णय दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ अन्वये सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात मुख्यमंत्री महिला सशक्तीकरणाच्या निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत

**(१६) ७२९०६ (२९-०२-२०२४). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिला व बाल विकास विभागाने मुख्यमंत्री महिला सशक्तीकरणाचा निर्णय माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान घेतला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संकल्पनेच्या अंमलबजावणीत अडथळे आले असल्याने २४ तासातच हे अभियान खंडित (ब्रेक) झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार मुख्यमंत्री महिला सशक्तीकरणाची योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (२९-०४-२०२४) :** (१) व (२) राज्यामध्ये महिलांच्या संदर्भात असणाऱ्या शासकीय योजना लोकाभिमुख करुन त्यांची अंमलबजावणी गतीमान करण्यासाठी "मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान" राबविण्याबाबतचा दि.२०.०९.२०२३ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन दि.०६.१०.२०२३ रोजी सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चंद्रपूर व गोंडपिंपरी (जि.चंद्रपूर) येथील आरोग्य केंद्रात रुग्णाची होणारी गैरसोय

**(१७) ७२९६० (०६-०३-२०२४). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडपिंपरी (जि.चंद्रपूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात अपघातात जखमी झालेल्या रुग्णांना उपचारासाठी आणले असता सुमारे अर्धातास त्यास आरोग्य सेवा पुरविण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे रुग्णांशी व त्यांच्या नातेवाईकांशी डॉक्टरांनी दारुच्या नशेत असभ्य वर्तन केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच,चंद्रपूर जिल्हा परिषद ते गोंडपिंपरी तालुक्यातील करंजी, वढोली आक्सापूर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र तर धानापुरातील आयुर्वेदिक दवाखान्यात वैद्यकीय अधिका-यांसह आरोग्य कर्मचा-यांची नियुक्ती केली मात्र कर्मचारी रुग्णालयात वेळेवर उपस्थित राहत नसल्याने रुग्णांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात न्यावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधित डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
सदर उपकेंद्र व दवाखान्यात उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने वैद्यकीय सेवा नियमितपणे पुरविले जात आहेत.
(४) घटनेचे दुसरे दिवशी जिल्हा शल्य चिकित्सक, चंद्रपूर निवासी वैद्यकीय अधिकारी (बाहयसंपर्क) यांनी ग्रामीण रुग्णालय, गोंडपिपरी येथे प्रत्यक्ष भेट देऊन यासंदर्भात वस्तुस्थितीची पडताळणी केलेली असल्याने चौकशी करण्यांत आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती व अकोला जिल्हयातील महिला बालविकास विभागाअंतर्गत कार्यरत कंत्राटी पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांना शासन सेवेत समावून घेणेबाबत

**(१८) ७२९६६ (२१-०२-२०२४). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती व अकोला जिल्हयातील महिला बालविकास विभागांतर्गत कार्यरत कंत्राटी पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांना शासन सेवेत समावून घेणेबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा. मंत्री, महिला व बालविकास यांच्याकडे निवेदनाव्दारे मागणी केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (०२-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) या अनुषंगाने आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाला आहे. याबाबत पुढील कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील औध जिल्हा रुग्णालयात रिक्त पदे भरणेसह मौजे मांरुजी येथे आरोग्य उपकेंद्र मंजूर करण्याबाबत**

**(१९) ७३०९१ (०६-०३-२०२४). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औंध (जि.पुणे) येथील जिल्हा रुग्णालयात अतिदक्षता विभागात एकच फिजीशियन असून विभागाचा कारभार निवासी डॉक्टरच पहात असून तेथे मनुष्यबळसुध्दा कमी असल्याने रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसल्याने रुग्णाचा मृत्यू होण्याची शक्यता निर्माण होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे मांरुजी (ता.मुळशी, जि.पुणे) येथील ग्रामस्थांना आरोग्य सेवा उपलब्ध होण्यासाठी येथे आरोग्य उपकेंद्र मंजूर करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिनांक ४ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औंध जिल्हा रुग्णालयात रिक्त पदे भरणेसह मौजे मांरुजी येथे आरोग्य उपकेंद्र मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१७-०५-२०२४) :** (१) व (२) जिल्हा रुग्णालय औंध (जि. पुणे) येथील मवैआसे गट-अ (वेतनस्तर एस-२३) मध्ये एकूण १९ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १५ पदे भरलेली व ४ पदे रिक्त आहेत. त्याचप्रमाणे मवैआसे गट-अ (वेतनस्तर एस-२०) मध्ये एकूण ३३ पदे मंजूर असून ती सर्व भरलेली आहेत.

मवैआसे गट-अ (वेतनस्तर एस-२३) मधील वैद्यकीय अधिकारी (भिषक) हे एक पद मंजुर असून ते भरलेले आहे. मेडीसीन विभागात येणा-या रुग्णांना उपचार मिळणेसाठी फिजीशियनच्या मदतीला दोन वैद्यकीय अधिकारी व निवासी डॉक्टरही सेवा देत आहे. तसेच आयपीएचएस अंतर्गत एक भिषक व एक हृदयरोगतज्ञ यांना या रुग्णालयात नियुक्ती देण्यात आलेली असल्याने रुग्णांची गैरसोय होत नाही.
(३) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय रुग्णालयांत व्यसनमुक्ती केंद्र उभारण्याबाबत

**(२०) ७३२४७ (०६-०३-२०२४). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तरुणवर्ग मोठया प्रमाणात दारुच्या व्यसनाधीन होत असल्याने शासकीय रुग्णालयांत व्यसनमुक्ती केंद्र उभारण्याबाबत मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रश्नाबाबत आढावा घेऊन राज्यातील शासकीय रुग्णालयांत व्यसनमुक्ती केंद्र उभारणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१६-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२)• राज्यात चार प्रादेशिक मनोरुग्णालयाव्दारे (ठाणे, पुणे, रत्नागिरी व नागपूर) येथे मनोरुग्णांना मानसिक आरोग्य सेवा (Teritary Care Services) दिली जात आहे.

• राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यामध्ये डि.एम.एच.पी टीमव्दारे रुग्णांना बाहयरुग्ण, आऊटरेज सेवा तसेच, आवश्यक असल्यास आंतररुग्ण सेवाही देण्यात येत आहे. मानसिक आरोग्य तपासणी, समुपदेशन आणि इतर सेवेसोबत व्यसनमुक्ती बाबतही रुग्णांना मार्गदर्शन आणि औषधोपचार सेवा देण्यात येत आहे.

• राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत जिल्हा रुग्णालय व प्रादेशिक मनोरुग्णालय पुणे येथे व्यसनमुक्ती केंद्र स्थापन करण्यात आले आहे. जिल्हा रुग्णालय गडचिरोली येथील व्यसनमुक्ती केंद्राव्दारे सन २०२२-२३ मध्ये १,०७१ रुग्णांना सेवा देण्यात आली आहे व सन २०२३-२४ मध्ये ८८० रुग्णांना सेवा देण्यात आली आहे.

• प्रादेशिक मनोरुग्णालय पुणे येथे व्यसनमुक्ती केंद्र मागील दोन वर्षापासून सुरु असून आजपर्यंत एकूण ३५० रुग्ण आषधोपचारव्दारे बरे झाले आहेत.

• धाराशिव जिल्हयांत जिल्हा रुग्णालयामध्ये मुंबई महानगरपालिकेच्या अधिपत्याखाली येणाऱ्या के.ई.एम रुग्णालयाच्या सहकार्याने व्यसनमुक्ती केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे.

• रु.५० लक्ष निधी पैकी रु.३८ लक्ष निधी सिंधुदुर्ग जिल्हयात बांधकाम, साहित्य सामुग्री व इतर खर्च याकरिता देण्यात आला आहे. सिंधुदुर्ग जिल्हयांने दि.११.०२.२०२४ रोजी कार्यारंभ आदेश दिलेला आहे.

• राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आरखडा २०२४-२६ मध्ये केंद्र शासनाकडे २९ व्यसनमुक्ती केंद्रासाठी निधी प्रस्तावित करण्यात आला होता, परंतु केंद्रशासनाने मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सन २०२४-२६ मध्ये निधी मंजूर केलेला नाही.

(३) प्रश्न उद्धवत नाही.

---

## वाशिम जिल्हयात "बेटी बचाओ –बेटी पढाओ" या अभियानाकरीता निधी मंजूर करणेबाबत

**(२१) ७३४०३ (२१-०२-२०२४). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयात केंद्र शासनाच्या "बेटी बचाओ –बेटी पढाओ" या अभियानांतर्गत गेल्या दीड वर्षांपासून निधी मिळाला नसल्याने सदर अभियानाची जनजागृती होत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार वाशिम जिल्हयात "बेटी बचाओ –बेटी पढाओ" या अभियानाकरीता निधी मंजूर करणेकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (०३-०४-२०२४) :** (१), (२), (३) व (४) वाशिम जिल्ह्यात "बेटी बचाओ बेटी पढाओ" या केंद्र पुरस्कृत योजनेकरिता सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामधील शिल्लक असलेल्या रुपये १५,९९,९३७/- पैकी रुपये १०,१४,७६२/- एवढी रक्कम सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात खर्च करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम रुपये ५,८५,१७५/- व यासंबंधीच्या खात्यावर मिळालेले व्याज केंद्र शासनाच्या सूचनेनुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय स्तरावरील SNA खात्यामध्ये जमा करण्यात आली व त्यामधून सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात रुपये ५ लक्ष एवढा निधी योजनेच्या प्रचार प्रसिध्दीकरिता जिल्हा स्तरावर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

---

## राज्यातील २२ जिल्ह्यातील अंगणवाडी व शालेय विद्यार्थांच्या आरोग्य तपासणीकडे होत असलेले दुर्लक्ष

**(२२) ७३८९६ (१२-०३-२०२४). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २२ जिल्ह्यातील अंगणवाडी व शालेय विद्यार्थांच्या आरोग्य तपासणीसाठी वापरल्या जाणा-या वाहनांची सेवा बंद पडली असल्याने जर विद्यार्थी आजारी पडल्यास त्यांना जिल्ह्याच्या ठिकाणी उपचारासाठी घेऊन जायला शासकीय वाहनच उपलब्ध नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिकच्या छत्रपती शिवाजी महाराज स्वयंरोजगार संस्था व महाराष्ट्र विकास समूहाला वाहन पुरविण्याचा ठेका सन २०१९ मध्ये देण्यात आला असून या दोन्ही समुहांनी राज्यातील २२ जिल्ह्यात सुमारे ७०० वाहने पुरविण्यासाठी तयारी दर्शविली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इंधनाचे दर रुपये शंभराच्या वर गेल्यानंतर शासनाने दर वाढवून देण्यासाठी सातत्याने दुर्लक्ष केल्याने कंत्राटदारांनी दिनांक १ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास वाहन सेवा थांबविली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने काही जिल्ह्यात प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या दरानुसार वाहनांसाठी निविदा मागविल्या परंतू दर परवडणारे नसल्याने निविदेला सर्वांनीच प्रतिसाद दिला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, ग्रामीण भागातील विद्यार्थांच्या सुदृढ आरोग्याच्या दृष्टीने सदरहू वाहनांची व्यवस्था तातडीने सुरू करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२७-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.

आरबीएसके कार्यक्रमांतर्गत २२ जिल्हयातील आरबीएसके पथकांसाठी मे. महाराष्ट्र विकास ग्रुप व मे. श्री छत्रपती शिवाजी महाराज स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था ली., या संस्थेद्वारे T-Permit वाहन सेवा मे २०२३ पर्यंत पुरविण्यात येत होती.

सदर दोन्ही संस्थांनी मुदतवाढ कालावधीमध्ये निविदेच्या मान्यता प्राप्त दरानुसार दि. १ जून, २०२३ पासून काम करण्यास नकार दर्शविला.त्यामुळे राज्यस्तरावर निविदा प्रक्रिया होईपर्यंत सदरहू प्रकरणी कामात व्यत्यय होऊ नये म्हणून जिल्हास्तरावरून तात्पुरत्या स्वरूपात T-permit वाहने RTO च्या प्रती किलोमीटरच्या दराने आरबीएसके आरोग्य पथकांच्या दळणवळणासाठी घेण्यात यावीत असे जिल्ह्यांना पत्राद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार सदर २२ जिल्ह्यामध्ये अंगणवाडी व शालेय विद्यार्थांच्या आरोग्य तपासणीसाठी वाहनांची सेवा सुरु ठेवण्याची उपाययोजना करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही,

सदर दोन्ही संस्थेने मुदतवाढ कालावधीमध्ये दि. १ जून, २०२३ पासून काम करण्यास नकार दर्शविला आहे. तसेच सदर दोन्ही संस्थानी राज्यातील २२ जिल्हयात निविदेच्या दराने वाहने पुरविण्यासाठी तयारी दाखविली असल्याची बाब माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये व त्या दरम्यान या कार्यालयास निदर्शनास आलेली नाही.

(३) आरबीएसके कार्यक्रमांतर्गत २२ जिल्हयातील आरबीएसके पथकांसाठी मे. महाराष्ट्र विकास ग्रुप व मे. श्री छत्रपती शिवाजी महाराज स्वयंम रोजगार सेवा सहकारी संस्था ली., या संस्थेद्वारे T-Permit वाहन सेवा मे २०२३ पर्यंत पुरविण्यात येत होती.सदर दोन्ही संस्थांनी मुदतवाढ कालावधीमध्ये निविदेच्या मान्य प्राप्त दरानुसार दि. १ जून, २०२३ पासून काम करण्यास नकार दर्शविला.

(४) राज्यस्तरावर निविदा प्रक्रिया होईपर्यत सदरहू प्रकरणी कामात व्यत्यय होऊ नये म्हणून जिल्हास्तरावरून तात्पुरत्या स्वरूपात T- permit वाहने RTO च्या प्रती किलोमीटरच्या दराने आरवीएसके आरोग्य पथकांच्या दळणवळणासाठी घेण्यात यावीत असे २२ जिल्ह्यांना पत्राद्वारे कळविण्यात आले.

उपरोक्त २२ जिल्ह्यांपैकी ७ जिल्हयात RTO च्या दराप्रमाणे वाहने मिळण्यास प्रतिसाद मिळाला व उर्वरित १५ जिल्ह्यातील जिल्हा शल्य चिकित्सक यांनी T-permit वाहने RTO च्या प्रती किलोमिटर दराने वाहने मिळत नसल्यावावत पत्राद्वारे कळविले होते.

(५) उपरोक्त २२ जिल्हयांपैकी १५ जिल्हयांमध्ये सदयस्थितीत कार्यरत असणा-या ७ आरबीएसके वाहन सेवा पुरवठादारांना नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आरवीएसके वाहने पुरवण्याबाबतचे दि. ७ नोव्हेंबर २०२३ रोजी आदेश देण्यात आले आहेत.

त्यानुसार राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये अंगणवाडी व शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांची सेवा सुरु आहे.

(६) लागु नाही.

---

### वैभववाडी (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात रुग्णांची होत असलेली गैरसोय

**(२३) ७४१७५ (०६-०३-२०२४). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभववाडी (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात पुरेसे वैद्यकीय अधिकारी / कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांना वेळेवर औषधोपचार मिळत नसल्याने त्यांची गैरसोय होते असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही दिवसांपासून येथे डेंग्यू व अन्य तापाच्या रुग्णांची संख्या वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रुग्णालयात तात्काळ आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन रुग्णांना चांगल्या दर्जाचे उपचार व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात अन्यथा रुग्णालय बंद करण्यात येईल असा इशारा सदर रुग्णालयाची पाहणी करुन स्थानिक नागरीकांसह एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०५-२०२४) :** (१) हे अशतः खरे आहे

ग्रामिण रुग्णालय, वैभववाडी जि. सिंधुदुर्ग येथे गट- अ ते गट-ड संवर्गातील एकूण २६ पदे मंजूर असुन १८ पदे भरलेली व ८ पदे रिक्त आहेत. सदर मंजुर पदांमध्ये ३ वैद्यकीय अधिकारी पदे मंजूर असुन ३ ही पदे तात्पुरत्या नियुक्तीने भरणेत आलेली आहेत. सदर रुग्णालयात अधिपरिचारिका यांची ०७ पदे मंजूर असून ०७ ही पदे भरलेली आहेत. अधिपरिचारीका व तांत्रिक कर्मचारी वर्ग यांचेमार्फत रुग्णालयात येणा-या रुग्णांवर वेळेवर औषधोपचार केले जातात. रुग्णांची गैरसोय होत नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) सार्वजनिक आरोग्य विभागातील गट-अ ते गट-ड ची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय मुलींच्या वसतिगृहात महिला सुरक्षा रक्षक नियुक्त करणेबाबत**

**(२४) ७४२८० (२९-०२-२०२४). श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय मुलींच्या वसतिगृहात महिला सुरक्षा रक्षक नियुक्त करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३). असल्यास, त्यांचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (२५-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवरी (ता.देवरी, जि.गोंदिया) येथील ग्रामीण रुग्णालयाचे लोकार्पण कार्यक्रम पुन्हा केल्याप्रकरणी.**

**(२५) ७४२९९ (०७-०३-२०२४). श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवरी (ता.देवरी, जि.गोंदिया) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या लोकार्पणाचा कार्यक्रम मा.पालकमंत्री, गोंदिया यांच्या हस्ते दिनांक २७ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास पार पडला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाचे लोकापर्ण यापूर्वीच स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या हस्ते पार पडले असताना पुन्हा लोकापर्ण कार्यक्रम आयोजित करण्यामागील कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरील प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०६-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.

देवरी येथील ग्रामीण रुग्णालयाच्या लोकार्पणाचा कार्यक्रम मा.पालकमंत्री, गोंदिया यांच्या हस्ते दि.२६ ऑक्टोबर २०२३ रोजी पार पडला आहे.

(२) देवरी ग्रामीण रुग्णालयाच्या नवनिर्मित इमारतीमध्ये विद्युत पुरवठयाची कोणतीही व्यवस्था नव्हती तसेच रुग्णालयातील शस्त्रकियागृह व इतर विभागातील कामे चालू असतांना मा. श्री. सहसराम कोरोटे, विधानसभा सदस्य यांनी स्वतः दि.१५ ऑगस्ट २०२३ रोजी जिल्हाधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक यांचे अनुपस्थितीत लोकार्पण सोहळा पार

पाडला होता.

सदर इमारतीचे लोकापर्ण केल्यानंतर दिनांक २१.०८.२०२३ रोजी उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर यांनी भेट देऊन नवनिर्मित इमारतीचे अपूर्ण बांधकाम २० ते २५ दिवसात पूर्ण करण्याच्या सूचना होत्या.

तद्नंतर, देवरी ग्रामीण रुग्णालयाच्या मुख्य इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मा.पालकमंत्री, गोंदिया यांच्या हस्ते दिनांक २६ ऑक्टोबर, २०२३ रोजी लोकार्पण सोहळा पार पडला.

(३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

---

**मलकापूर (जि.बुलढाणा ) येथील उपजिल्हा रुग्णालयात अतिदक्षता विभाग तयार करून कायमस्वरूपी डॉक्टरांची नियुक्ती करण्याबाबत**

**(२६) ७४३९८ (०६-०३-२०२४). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा ) येथील उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांचे स्वतःचे खाजगी क्लिनिक असून ते तेथे जास्त वेळ देत असून रुग्णलयात कमी वेळ देतात किंवा गैरहजर रहात असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मलकापूर लगत राष्ट्रीय महामार्ग असल्याने येथे अपघाताचे प्रमाण जास्त आहे तथापि, सदर उपजिल्हा रुग्णालयात अतिदक्षता विभाग नसल्याने तसेच कायमस्वरूपी डॉक्टर नसल्याने ब-याचदा रुग्णांस दुसरीकडे संदर्भित (रेफर) केले जात असल्याने येथे अतिदक्षता विभागाची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३ ) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार मलकापूर उपजिल्हा रुग्णालयामध्ये अतिदक्षता विभाग तयार करून कायमस्वरूपी डॉक्टरांची नियुक्ती करण्यासह गैरहजर वैद्यकीय अधिकारीऱ्यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) उपजिल्हा रूग्णालय, मलकापूर येथे अतिदक्षता विभाग मंजूर नाही. तथापि, उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने सर्वसामान्य रूग्णांना उपचार पुरविण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) उपजिल्हा रूग्णालय, मलकापूर येथे अनधिकृत गैरहजर असलेल्या ३ वैद्यकीय अधिकाऱ्यांना ज्ञापन बजावण्यात आले असता २ वैद्यकीय अधिकारी रूजू झाले असून एका वैद्यकीय अधिकाऱ्यास रूजू करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधिन आहे.

वैद्यकीय अधिकारी गट-अ (एस-२०) ची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(५) निरंक.

---

### बुलढाणा जिल्ह्यातील आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२७) ७४४०० (०७-०३-२०२४). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील सहा तालुक्यांमध्ये आरोग्य अधिकाऱ्यांची पदे रिक्त असून ४९ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये महत्त्वाची असणारी वैद्यकीय अधिकारी गट "अ" पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यातील लोकसंख्या दोन लाखापर्यंत असून शहर व १०२ गावांची नागरिकांची आरोग्य सेवा ही फक्त चार प्राथमिक आरोग्य केंद्रावर अवलंबून असून त्यामध्ये नांदुरा शहरातील प्राथमिक आरोग्य केंद्रावर नियमित ५०० पेक्षा जास्त रुग्णांची तपासणी केली जाते असून गंभीर रुग्णांना खामगाव येथे संदर्भित (रेफर) केले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदांपैकी नांदुरा तालुक्यात ११० पदे मान्य असताना केवळ ४१ पदे भरण्यात आली असून ६१ पदे रिक्त असून स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्याबाबत शासनाकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रामीण भागात आरोग्य सेवा-सुविधा मिळण्याकरीता आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०५-२०२४) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

(४) वैद्यकीय अधिकारी, गट-अ व वर्ग-३ ची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बुलढाणा येथील जिल्हा शल्य चिकित्सक यांच्यावर कारवाई करणेबाबत

**(२८) ७४४०९ (०७-०३-२०२४). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा येथील जिल्हाशल्य चिकित्सक पदी डॉक्टर सुभाष चव्हाण यांची नियुक्ती चुकीच्या पद्धतीने करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांच्या नियुक्तीपासून जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा संपूर्णतः वादाच्या भोवऱ्यात सापडली असून रुग्णांच्या आरोग्याचा प्रश्नही निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांच्या विरोधात करण्यात आलेल्या तक्रारींवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, डॉक्टर सुभाष चव्हाण हे ऑर्थोपेडिक सर्जन असताना बुलढाणा येथे रुग्णांकडून चार हजार रुपये स्वीकारताना पकडले असतानासुद्धा त्यांना त्याच ठिकाणी त्याच पदी नियुक्ती केले ,हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०४-०४-२०२४) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.
सदर प्रकरणी मा. न्यायालयीन तसेच प्रशासकीय कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यातील आरोग्य विभागातील रिक्त पदे तसेच सोयी-सुविधाअभावी रुग्णांची होणारी गैरसोय**

**(२९) ७४४८६ (०७-०३-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यात आरोग्य विभागात Anaesthetist, Administrative officer, Class-I Medical Officers, MS Medical Superintendent, Radiologist, ACS, RMO (Outreach) ही पदे रिक्त असल्याने याचा परिणाम रुग्ण सेवेवर होत असल्याने सदर पदे तातडीने भरण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. आरोग्य मंत्री यांच्याकडे दिनांक २८ जून,२०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच , जिल्ह्यातील जिल्हा रूग्णालय, उपजिल्हा रूग्णालय, ग्रामीण रूग्णालयात रूग्णांची आरोग्य सेवा सुविधा अभावी गैरसोय होत असून रूग्णालयातील डॅक्टर कामकाजाच्या वेळेत रुग्णालयात बसत नसल्याने याबाबत उपसंचालक, लातूर यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास जिल्हाशल्यचिकित्सक, बीड यांच्या कडून खुलासा मागविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०४-०४-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.
आरोग्य विभागात उपलब्ध अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून रुग्णांना योग्य ती रुग्ण सेवा देण्यात येत आहे.
(२) व (३) हे खरे आहे.
दि.१४.१०.२०२३ रोजी दैनिक लोकमतमध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने, संबंधित कार्यालयाला कार्यालयीन कामकाजामध्ये सुधारणा करण्याबाबतच्या सुचना दिलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अनाथ आणि विधी संघर्षित बालकांना सांभाळणाऱ्या संस्थांना अनुदान मिळणेबाबत**

**(३०) ७४५८३ (२९-०२-२०२४). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनाथ आणि विधी संघर्षित बालकांना सांभाळणाऱ्या राज्यातील सुमारे चाळीस संस्थांना गेल्या १८ महिन्यांपासून परीपोषणाचा खर्च शासनाकडून मिळालेला नसल्याने या मुलांच पालन-पोषण करणे संस्थांना कठीण होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, या संस्थांना महिला व बालकल्याण विभागामार्फत अनुदान दिले जाते व शासकीय अनुदान प्रतिविद्यार्थी साधारणतः शंभर रुपये असून त्या रुपयात मुलांना चहापाणी, नाष्टा, दोन वेळेचे भोजन देणे अपेक्षित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनाथ आणि विधी संघर्ष बालकांना पोषण आहार मिळावा याकरिता शासनाने संस्थांना नियमित अनुदान देण्यात यावे अशी मागणी करण्यात येत असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (२२-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही,

शासन निर्णय दि.९.५.२०२३ अन्वये मिशन वात्सल्य योजनेंतर्गत बाल काळजी व संरक्षणाशी संबंधित संस्थेतील प्रवेशितांच्या परिपोषणासाठी अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे,

केंद्र शासनामार्फत मिशन वात्सल्य योजनेंतर्गत बाल काळजी व संरक्षणाशी संबंधित संस्थेतील प्रवेशितांसाठी प्रतिलाभार्थी दरमाह ₹३,०००/- इतके अनुदान निश्चीत केले असून त्यानुसार अनुदान अदा करण्यात आले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) मिशन वात्सल्य योजनेंतर्गत कार्यरत संस्थांना परिपोषण अनुदान वितरणामधील तांत्रिक अडचणी दूर करण्यात आल्या अनुदान वितरणासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आली असल्याने चौकशीची आवश्यकता नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिंतूर (जि.परभणी) येथील ग्रामीण रुग्णालयाला संलग्न असलेले ट्रामा केअर सेंटर मध्ये मनुष्यबळ पुरविणेबाबत

**(३१) ७४६५९ (०७-०३-२०२४). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतूर (जि.परभणी) येथील ग्रामीण रुग्णालयाला संलग्न असलेले ट्रामा केअर सेंटर येथे मनुष्यबळाअभावी कोणत्याही मोठया शस्त्रक्रिया या होत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयातील वैद्यकीय अधिका-यांचे दुर्लक्ष होत असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ट्रामा केअर सेंटरमध्ये मनुष्यबळ उपलब्ध करुन रुग्णांना सेवा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०५-२०२४) : (**१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) वैद्यकीय अधिकारी, गट-अ (एस-२०) पदाची भरतीप्रक्रिया सुरू आहे. तसेच गट-क व गट-ड च्या रिक्त पदांची भरतीप्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सालई (कला) ( ता. सेलू, जि. वर्धा ) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांबाबत

**(३२) ७४७५५ (०७-०३-२०२४). श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालई (कला) (ता. सेलू, जि. वर्धा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर श्री.अक्षय झवेरी हे वैद्यकीय अधिकारी या पदावर कार्यरत असून ते शासकीय सेवेत असून देखील एका राजकीय पक्षाचे कार्यरत पदाधिकारी आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डॉक्टर हे दिल्ली येथे एका राजकीय कार्यक्रमात उपस्थित असताना त्याच दिवशी त्यांची प्राथमिक आरोग्य, केंद्र सालई (कला) येथे उपस्थित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांच्याकडे तक्रार केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर तक्रारींच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०५-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही,
चौकशी अहवालानुसार त्यांनी खाजगी कारणास्तव किरकोळ रजेचा रजेचा अर्ज सादर केल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) हे खरे आहे,
(४) सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवालाचे अनुषंगाने डॉ. अक्षय जव्हेरी, कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची सेवा दि. २९.११.२०२३ पासून समाप्त करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबाजोगाई ( जि. बीड) येथे केंद्र पुरस्कृत स्वाधार गृह योजना मंजूर करणेबाबत**

**(३३) ७४७७७ (२०-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हयात सद्य:स्थितीत एक स्वाधार गृह कार्यान्वित आहे परंतु बीड ते अंबाजोगाई शहर हे अंतर १०० कि.मी असल्याने पिडीत तसेच संकटग्रस्त महिलांना निवास व्यवस्था, कायदेशीर मदत तातडीने मिळणेच्या दृष्टीने अंबाजोगाई शहरात एक केंद्र पुरस्कृत स्वाधार गृह योजना मंजूर करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मंत्री, महिला व बालविकास यांच्याकडे दिनांक १९ जुलै, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी केली काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (२९-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शासन निर्णय २९/०३/२०२३ अन्वये केंद्र पुरस्कृत स्वाधार व उज्ज्वला योजना प्रशासकीय कारणास्तव केंद्र पुरस्कृत "शक्ती सदन" योजनेमध्ये विलीन करण्यात आल्या आहेत. त्यामुळे यापुढे नवीन स्वाधार गृह योजनेस मान्यता देणे शक्य नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात महिला धोरणाची अंमलबजावणी करणेबाबत**

**(३४) ७५१५१ (२९-०२-२०२४). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याचे महिला धोरणाबाबत मंत्रालयात दिनांक २३ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास सादरीकरण झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महिला धोरणाची वैशिष्टये काय आहेत,
(३) असल्यास, सदर धोरणाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**कुमारी आदिती तटकरे (२२-०५-२०२४) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) महिला सक्षमीकरण व विकासासाठीचे सर्वांगीण, सर्वंकष व सर्वसमावेशक "महाराष्ट्र राज्याचे ४ थे अष्टसुत्री महिला धोरण" तयार करण्यात आले आहे.

सदर महिला धोरण तयार करताना महत्वाची क्षेत्रे सुनिश्चित करुन त्यांच्या अंमलबजावणीचा आराखडा तयार करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या महत्वाच्या क्षेत्रांसाठीच्या कृती आराखडयामधील उद्दिष्टे गणनात्मक आहेत. केवळ कृती आराखडाच नव्हे तर धोरणाच्या अंमलबजावणीच्या प्रगतीचे संनियंत्रण करण्यासाठी संस्थात्मक व्यवस्था निर्माण करणे ही या धोरणाची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

(३) "महाराष्ट्र राज्याचे ४ थे महिला धोरण-२०२४" दि.०७.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आले आहे.

---

**कुमारी आदिती तटकरे (२६-०४-२०२४) :** (१) व (२) महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत कार्यरत सहयोगिनी यांना लोकसंचलित साधन केंद्र (बचत गटांचे नोंदणीकृत फेडरेशन- सीएमआरसी) यांच्यामार्फत मानधन देण्यात येते. सदर फेडरेशन हे सोसायटी ॲक्ट व ट्रस्ट ॲक्ट खाली नोंदणीकृत असल्याने याबाबतचा निर्णय फेडरेशन स्तरावर घेण्यात येतो.

(३) ग्राम विकास विभागाच्या दि.१४.१०.२०१६ च्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत नियमित कर्जफेड करणाऱ्या केंद्र शासनाकडून व्याज अनुदान प्राप्त झालेल्या पात्र महिला स्वयंसहाय्यता समुहांना सवलतीच्या व्याजदराने कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी "सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना" सुरु आहे. सदर योजनेचा लाभ महिला आर्थिक विकास महामंडळाच्या (माविम) पात्र बचत गटांनाही देण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### आरोग्यवर्धिनी केंद्रात पूर्णवेळ डॉक्टर उपलब्ध करुन देणेबाबत

**(३५) ७५२१४ (०७-०३-२०२४). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे नाव बदलून आरोग्यवर्धिनी केंद्र करण्यात आले असून या केंद्राच्या माध्यमातून महिला बाल संसर्गजन्य रोग आदी १३ प्रकारच्या आरोग्य सेवा देण्याचे निश्चित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्यवर्धिनी केंद्राला पूर्ण वेळ डॉक्टर नसल्याने त्याचा परिणाम ग्रामीण आरोग्य सेवेवर होत असून राज्यभरात १० हजार ६7३ आरोग्यवर्धिनी केंद्र असून तेथे तेवढेच डॉक्टर अपेक्षित असताना केवळ ७ हजार ६०० डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे दिनांक १३ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांची गैरसोय होत असून कित्येकदा पूर्णवेळ डॉक्टर नसलेल्या ठिकाणी उपचाराविना परतावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ज्या आरोग्यवर्धिनी केंद्रात पूर्णवेळ डॉक्टर नाही अशा केंद्रात पूर्ण वेळ डॉक्टर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२७-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे

(२) हे खरे नाही.

सद्यस्थितीत राज्यात एकुण १०,7४६ उपकेंद्र कार्यान्वित असून, त्यापैकी ७६० उपकेंद्र हे प्राथमिक आरोग्य केंद्राला Co-Located आहेत. Co-Located उपकेंद्र च्या कार्यक्षेत्रात प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी कार्यरत असतात. त्यामुळे केंद्रशासनाच्या सूचनानुसार Co-Located उपकेंद्र हे आरोग्यवर्धिनी केंद्रात रुपांतरीत करणे अपेक्षित नाही. त्यास्तव अशा ठिकाणी समुदाय आरोग्य अधिकारी देण्यात आले नाहीत. परंतु, उर्वरित ९८८६ उपकेंद्र हे आरोग्यवर्धिनी केंद्रात रुपांतरीत करण्यात येत असून सद्यस्थितीत ८१५० समुदाय आरोग्य अधिकारी है कार्यरत असून ९८० समुदाय आरोग्य अधिकारी यांचे ६ महिन्याचे प्रशिक्षण सुरु आहे. प्रशिक्षणानंतर जानेवारी २०२४ पर्यंत सदर CHO

हे रुजू होतील तसेच ८७ समुदाय आरोग्य अधिकारी हे मे २०२४ पर्यंत रुजू होतील.

तसेच उर्वरित ६६९ समुदाय आरोग्य अधिकारी भरणेकरीता राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत २०२४-२६ च्या कृतीआराखडा मध्ये अनुदानाची मागणी करण्यात आली आहे.

तसेच उपकेंद्र स्तरावर पूर्णवेळ आरोग्य सेविका उपलब्ध असते त्यामुळे ग्रामीण आरोग्य सेवेवर परिणाम होत असल्याची बाब खरी नाही.

(३) हे खरे नाही

आरोग्यवर्धिनी केंद्रातील समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविका / बहुउद्देशीय आरोग्य सेवक यांच्या मार्फत १३ प्रकारच्या आरोग्य सेवा ग्रामीण जनतेला उपलब्ध करून देण्यात येत आहेत. समुदाय आरोग्य अधिकारी मार्फत सकाळी ८.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येते तसेच उपकेंद्र स्तरावर पूर्णवेळ आरोग्य सेविका उपलब्ध असते.

(४) शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार उपकेंद्राच्या ठिकाणी, पुर्णवेळ समुदाय आरोग्य अधिकारी देणे अपेक्षित नाही परंतु, उपकेंद्र स्तरावर पुर्णवेळ आरोग्य सेविका उपलब्ध असते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### स्व. सौ. वेणुताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालय, कराड येथील रिक्त पदे भरणे व सुरक्षा रक्षकाचे वेतन वेळेवर अदा करण्याबाबत

**(३६) ७५८४९ (०७-०३-२०२४). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि.सातारा) येथील स्व. सौ. वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षक (गट – अ) हे पद मागील दीड वर्षांपासून रिक्त असून (गट-अ) आणि (गट- ब) सह (वर्ग ३ व वर्ग ४) मधील एकूण मंजूर पदांपैकी ३० टक्क्यांच्यावर पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयात कंत्राटी सुरक्षा रक्षकाचे वेतन वेळेवर होत नसल्याने ते आर्थिक विवंचनेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना उपचार घेण्यामध्ये गैरसोय होत असून त्यांना नाईलाजास्तव खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रुग्णालयातील रिक्त पदे त्वरीत भरण्यासह कंत्राटी सुरक्षा रक्षकाचे वेतन वेळेवर अदा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,५.नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०४-०४-२०२४) :**(१) व (२) हे खरे आहे.

सुरक्षा रक्षकांचे वेतन अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) हे खरे नाही.

स्व.सौ. वेणुताई चव्हाण, उपजिल्हा रुग्णालय कराड, येथे स्त्रीरोगतज्ञ, भूलतज्ञ, फिजीशियन, बालरोगतज्ञ, नेत्रशल्यचिकित्सक व दंतशल्यचिकित्सक इत्यादी विशेषज्ञ नसल्यामुळे राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत रुग्णालयीन पॅनलवर स्त्रीरोगतज्ञ, बालरोगतज्ञ, भुलतज्ञ यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांचेमार्फत सेवा पुरविण्यात येत आहे. तसेच आय.पी.एच. अंतर्गत अस्थिरोगतज्ञांची नेमणूक केली असल्याने त्यांचेमार्फत अस्थिरुग्णांना सेवा पुरविण्यात येत आहेत. रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना उपलब्ध अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत रुग्णसेवा देण्यात येत आहे.

(४) सुरक्षा रक्षकांचे वेतन अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच पदभरती प्रक्रिया सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सातारा जिल्हयात वातावरणातील बदलत्या हवामानामुळे आजारांचा प्रादुर्भाव वाढत असल्याबाबत

**(३७) ७५९२४ (०७-०३-२०२४). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यात वातावरणात बदल झाल्यामुळे व बदलत्या हवामानामुळे सर्वच भागातील नागरीकांमध्ये ताप, सर्दी, खोकल्यासह अन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढू लागला आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, या साथ आजारांचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केलया वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास , विलंबाची करणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१६-०५-२०२४) :** (१) हे खरे आहे.

दरवर्षी वातावरणामध्ये बदल झाल्यामुळे ताप, सर्दी, खोकला याप्रकारची लक्षणे असलेल्या रुग्णांमध्ये वाढ होते. माहे, जून २०२३ नंतर रुग्णसंख्यामध्ये वाढ झाली आहे.

(२) होय.

आरोग्य कर्मचारी यांचेमार्फत नियमित गृहभेटी दरम्यान ताप, सर्दी, खोकला व इतर आजारांची चौकशी करण्यात येते.

(३) आरोग्य कर्मचारी यांचेमार्फत नियमित गृहभेटी दरम्यान ताप, सर्दी, खोकला व इतर आजारांची चौकशी करण्यात येऊन, त्यानंतर किरकोळ औषधोपचार करण्यात येतो. तसेच, जर लक्षणामध्ये फरक न पडल्यास रुग्णांवर नजिकच्या प्राथमिक आरोग्य केंद्र /ग्रामिण रुग्णालय /उपजिल्हा रुग्णालय येथे औषधोपचार करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे जिल्हा रुग्णालयातील अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक व डॉक्टरांवर कारवाई करणेबाबत

**(३८) ७५९५६ (०७-०३-२०२४). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हा रुग्णालयातील अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.स्वप्निल पाटील यांना बाहय रुग्ण विभागात काम करणे बंधनकारक असतानाही ते त्यांचे काम न करता रुग्णांना त्रास देत असणे, महिला कर्मचा-यांचे लैंगिक शोषण करीत असल्याच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधींना प्राप्त झाल्या असून त्यांच्यावर चौकशी करुन कारवाई न करता जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वानेरे हे त्यांची पाठराखण करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर रुग्णालयातील डॉ. संजय शिंदे हे मागील १० वर्षापासून एकाच पदावर कार्यरत असून ते खाजगी प्रॅक्टीस करीत असल्याने जिल्हा रुग्णालयात येणा-या रुग्णांकडे त्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४)असल्यास, त्यानुसार सदर रुग्णालयात येण्या-या रुग्णांची गैरसोय टाळण्याकरीता संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०४-०४-२०२४) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील सर जे.जे. महानगर रक्तकेद्रांत आवश्यक उपकरणांची उणीव व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३९) ७६०४३ (०७-०३-२०२४). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय परिसरच्या अखत्यारितील सर जे.जे.महानगर रक्तकेद्रांची दुरवस्था झाली असून रक्तसंकलन, त्याची साठवणूक आणि विलगीकरणासाठी आवश्यक असणारी उपकरणे जुनी झाली असल्याचे दिनांक २९ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी नॅट टेस्टिंग, ब्लड बॅग सेलर, हिमोग्लोबीन चाचणीसाठी शिबिरांच्या ठिकाणी होमोक्यु यंत्र, ब्लड बॅग वेट यंत्र आदि अनेक गोष्टींची आवश्यकता असतांना आरोग्य संचालक व रक्तपेढीशी संबंधित सहाय्यक संचालकांनी गेल्या अनेक वर्षात एकदाही सर जे.जे.महानगर रक्तकेंद्राला भेट देऊन पाहणी केली नसल्याचे त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रक्तकेद्रांची संकलनाची क्षमता सुमारे ४५ हजार पिशव्या इतकी आहे तथापि रिक्त पदांमुळे वार्षिक ३० हजार पिशव्या रक्त संकलन केले जात असून तेथील रिक्त पदे व वेतन विसंगती इत्यादी बाबींसंदर्भात सदर रक्तपेढी प्रशासनाने मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री तसेच अतिरिक्त मुख्य सचिव, आरोग्य विभाग यांना निवेदने देण्यात आली असून त्याद्वारे कार्यवाहीची मागणी केलेली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य रक्त संक्रमण परिषदेत (एसबीटीसी) पूर्णवेळ सहाय्यक संचालक नसणे तसेच अनेक कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याचेही निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१६-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही.

सदरच्या रक्तकेंद्रास अद्ययावत व अत्याधुनिक अशी यंत्रसामुग्री पुरविण्यात आलेली आहे. तथापि, दि. ३० ऑगस्ट, २०२३ रोजी दै.लोकसत्ता या वृत्तपत्रामध्ये जे.जे.महानगर रक्तपेढीत आवश्यक उपकरणांची वानवा या मथळयाखाली बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) हे खरे नाही.

औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याअंतर्गत नियम १९४५ नुसार नॅट टेस्ट (न्युक्लिईक ॲसिड टेस्ट) बंधनकारक नाही. याबाबत सहाय्यक संचालक जनरल, नॅको, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी देखील सदर नॅट टेस्ट बंधनकारक नसल्याचे कळविले आहे. इतर साहित्यसामुग्री उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच, संचालक व सहाय्यक संचालक हे वेळोवेळी रक्तकेंद्रास भेट देऊन कामकाजाचा आढावा घेत असतात.

(३) रक्तकेंद्रांची रक्त साठवणूकीची विशिष्ट क्षमता नसते. रक्त हे रक्तकेंद्राच्या गरजेनुसार संकलित करावयाचे असते.
सर जे.जे. महानगर रक्तकेंद्र, भायखळा मुंबई येथील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी निवेदने सादर केली होती. त्या अनुषंगाने तपासून योग्य ती कार्यवाही करण्यात आली आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागणीप्रमाणे वेतनवाढीचा दर दि.०१.०४.२०२३ पासून ५% वरुन ८% करण्यात आलेला आहे व इतर मागण्यांसाठी संचालक, आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलेली आहे.

(४) व (५) राज्य रक्त संक्रमण परिषद कार्यालयासाठी नियमित पूर्णवेळ सहाय्यक संचालक नाहीत हे खरे आहे. तथापि, या पदाचा अतिरिक्त कार्यभार राष्ट्रीय आरोग्य अभियान या कार्यालयातील सहाय्यक संचालक (बल्ड सेल) यांना तात्पुरता देण्यात आलेला आहे.

सर जे.जे. महानगर रक्तकेंद्राची कंत्राटी मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| पदाचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| वैद्यकीय संचालक | १ | १ | ० |
| रक्त संक्रमण अधिकारी | ६ | ५ | १ |
| गुणवत्ता अधिकारी | १ | १ | ० |
| तांत्रिक पर्यवेक्षक | २ | २ | ० |
| अधिपारिचारिका | ५ | ५ | ० |
| रक्तकेंद्र तंत्रज्ञ | १८ | १८ | ० |
| वैद्यकीय समाजसेवक | ४ | ४ | ० |
| वाहनचालक | ४ | ४ | ० |
| एकूण तांत्रिक पदे | ४१ | ४० | १ |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येईल की, फक्त रक्त संक्रमण अधिकाऱ्याचे एक पद रिक्त आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील आरोग्य अधिकारी, कर्मचारी यांची रिक्त पदे भरणेबाबत**

**(४०) ७६१०१ (११-०३-२०२४). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील आरोग्य अधिकारी, कर्मचारी यांची ५० टक्के पदे अनेक दिवसांपासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या काही दिवसांपासून तालुक्यात साथीचे रोग पसरत असून रिक्त जागांमुळे कार्यरत कर्मचा-यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तालुक्यातील आरोग्य अधिकारी, कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव तालुका वैद्यकीय अधिकारी यांनी वरिष्ठांकडे सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,यास किती कालावधी अपेक्षीत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०५-२०२४) :** (१) आरोग्य विभाग, पंचायत समिती, नांदगाव, जि. नाशिक तालुक्यामध्ये एकूण १३३ पदे मंजूर असून त्यापैकी ५६ पदे भरलेली व ७७ पदे रिक्त आहेत.

वैद्यकीय अधिकारी, गट-अ (एस-२०) व गट-ब (एस-१६) मिळून एकूण १२ पदे मंजूर असून त्यापैकी १० पदे भरलेली व ०२ पदे रिक्त आहेत. आरोग्य सहायक (पुरूष) यांची एकूण ०७ पदे मंजूर असून त्यापैकी ०६ पदे भरलेली व ०१ पद रिक्त आहे.

(२) तालुक्यात साथीचे रोग पसरलेले नाहित. परंतु वैद्यकीय सेवा सुरळीत चालण्याच्या दृष्टीकोनातून कार्यरत कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कामकाज देण्यात येते.

(३) व( ४) वैद्यकीय अधिकारी, गट-अ (एस-२३) ची पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

वैद्यकीय अधिकारी, गट-अ (एस-२०) ची एकूण १७२९ रिक्त पदांची जाहिरात दि. ३१.०१.२०२४ रोजी वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार ऑनलाईन पद्धतीने निवड प्रक्रिया राबविण्यात येऊन दि. २९.०२.२०२४ रोजी १४४६ एमबीबीएस अर्हताधारक उमेदवारांच्या नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

तसेच वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गातील रिक्त पदे भरतीसंदर्भात कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडारा जिल्ह्यातील रुग्णालयात उच्च रक्तदाब व मधुमेह औषधाचा तुटवडा भासत असल्याबाबत

**(४१) ७६१८० (११-०३-२०२४). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यातील रुग्णालयात उच्च रक्तदाब व मधुमेह या आजारावरील औषधांचा तुटवडा असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वी सदर औषधांचा पुरवठा हा राज्यस्तरावरून करण्यात येत होता परंतु माहे ऑक्टोबर, २०२२ पासून शासन स्तरावरून या औषधांचा पुरवठा बंद झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औषध खरेदीसाठी वार्षिक मागणीच्या अनुषंगाने अनुदान प्राप्त होत नसल्याने या रुग्णालयाला निधीचा तुटवडा भासत असल्याने उच्च रक्तदाब व मधुमेह या आजारावरील औषध रुग्णांना पुरवण्यासाठी शासन तात्काळ निधी उपलब्ध करून देणार काय,
(४) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२१-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) उच्च रक्तदाब व मधुमेह या आजारावरील औषध खरेदीसाठी भंडारा जिल्हा रुग्णालयाकरिता खालीलप्रमाणे अनुदान वितरित करण्यात आलेले आहे.

सन २०२२-२३

| अ.क्र. | स्तर/योजना | भंडारा जिल्हा (वितरित निधी) |
|---|---|---|
| १ | आरोग्य सेवा आयुक्तालय | रु.५०.०० लाख |
| २ | राष्ट्रीय आरोग्य अभियान | रु.१४०.००लाख |
| ३ | असंसर्गजन्य आजार | रु.१२.९९ लाख |
| ४ | जिल्हा नियोजन | रु.२५०.००लाख |

सन २०२३-२४

| अ.क्र. | स्तर/योजना | भंडारा जिल्हा (वितरित निधी) |
|---|---|---|
| १ | आरोग्य सेवा आयुक्तालय | रु. ७५.३३ लाख |
| २ | राष्ट्रीय आरोग्य अभियान | रु. ४५.०० लाख |
| ३ | असंसर्गजन्य आजार | रु.३.०९ लाख |
| ४ | जिल्हा नियोजन | रु.३००.०० लाख |

तसेच राज्यस्तरावरील योजनेतंर्गत उच्च रक्तदाब व मधुमेहांवरील औषधांची खरेदी महाराष्ट्र वैदयकीय वस्तु खरेदी प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या कार्यालयांमधील रिक्त पदे भरणेबाबत

**(४२) ७६४३३ (११-०३-२०२४). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात अतिरिक्त संचालक, कुटुंब कल्याण व सहायक संचालक, क्षयरोग व कुष्ठरोग सहसंचालक व सहायक संचालक, हिवताप, जलजन्य रोग, हत्तीरोग, सहसंचालक व सहायक संचालक, राज्य माहिती व जीवन विषयक आकडेवारी, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र ही महत्वाची कार्यालये कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यातील जवळपास सर्वच कार्यालयांतील अधिकाऱ्यांकडे रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे आरोग्य विभागाचे कामकाज संथ गतीने सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रिक्त पद भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०४-०४-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
पुणे मुख्यालयातील १० कार्यालयातील
अ)सहसंचालक, आरोग्य सेवा(हि.ह. व ज.रो.) पुणे
आ)उपसंचालक, आरोग्य सेवा(परिवहन), पुणे या पदावर अतिरिक्त स्वरुपात अन्य अधिकाऱ्याकडे कार्यभार सोपविण्यात आला आहे. उर्वरित ७ पदांवर पुर्णवेळ अधिकारी उपलब्ध आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(5) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यामध्ये अनाथ मुले शासकीय अनुदानापासून वंचित असल्याबाबत

**(४३) ७६४७७ (२९-०२-२०२४). श्री.मानसिंग नाईक (शिराळा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील चार हजार अनाथ मुले मागील सात महिन्यांपासून शासकीय अनुदानापासून वंचित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील नेमकी किती बालके या योजनेस पात्र आहेत व नेमके किती अनुदान थकीत आहे ,
(३) असल्यास, या योजनेंतर्गत तत्काळ शासकीय अनुदान देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (२२-०५-२०२४)** :(१) व (२) बालगृहातील २५१ आणि बाल संगोपन योजनेचे २४७८ बालके योजनेस पात्र आहेत. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेचे पहिल्या तिमाहिसाठी सांगली जिल्ह्यासाठी ₹१.६७ कोटी अनुदान दि.२५.७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आले आहेत. तर उर्वरित नऊमाहिचे ₹५ कोटी अनुदान वितरणाच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे. तसेच बालगृह योजनेचे ₹२२.४६ लाख अनुदान दि.०७.११.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये अदा करण्यात आले आहे.
(३) क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेंतर्गतच्या लाभार्थ्यांचे अनुदान सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्यामार्फत या योजनेंतर्गतच्या सर्व पात्र लाभार्थ्यांना अदा करण्यात येत आहे. तसेच बालगृह योजनेंतर्गतचे अनुदान देखील आयुक्तालय स्तरावरुन थेट संस्थेच्या बँक अकांऊटमध्ये जमा करण्यात येत आहे.

(४) क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेंतर्गतच्या लाभार्थ्यांचे अनुदान वितरीत होण्यास होणार विलंब टाळण्यासाठी सन २०२३-२४ या वित्तीय वर्षापासून सदर योजनेचा लाभ आयुक्तालय स्तरावरुन थेट बालकाच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येणार आहे. यासाठी सर्व लाभार्थ्यांची माहिती एकत्रित करण्यात आलेली आहे. परंतु काही जिल्ह्यातील लाभार्थ्यांच्या माहितीमध्ये बँकेचा चुकीचा IFSC, MICR कोड, बालकांच्या नावामधील स्पेलिंगमुळे नावांतील तफावत, अर्धवट बँक खाते क्रमांक अशा तफावती असल्याने लाभाची रक्कम अदा करण्यास अडथळे येत आहेत. तथापि, संबंधित जिल्ह्याकडून लाभार्थ्यांची अद्ययावत माहिती प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच अचूक माहिती असलेल्या लाभार्थ्यांची रक्कम लाभार्थ्यांस अदा करण्यात आलेली आहे.

---

## खर्डी (ता.शहापूर,जि.ठाणे) येथील ग्रामीण रुग्णालयात एकच डॉक्टर कार्यरत असल्याबाबत

**(४४) ७६८६७ (११-०३-२०२४). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खर्डी (ता.शहापूर,जि.ठाणे) येथील ग्रामीण रुग्णालयात रोज २०० ते २५० रुग्णांची तपासणी होत असून रात्री-अपरात्री अपघातग्रस्त रुग्णही आणले जातात मात्र सदर रुग्णालयातील तीनपैंकी एका डॉक्टरने राजीनामा दिला असून उर्वरित दोन डॉक्टर सात-सात दिवस आलटून पालटून रुग्णालयांत येत असल्याने सद्य:स्थितीत रुग्णालयात एकच डॉक्टर कार्यरत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांची मंजूर पदे किती आहेत व प्रत्यक्षात कार्यरत किती आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय , त्यानुसार संबंधित डॉक्टरांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०५-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे,

वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या ०३ पदांपैकी ०२ पदांवर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. एक नियमित वैद्यकीय अधिकारी यांनी स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतल्याने पद रिक्त झाले आहे. कार्यरत दोन वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत रूग्णांना नियमितपणे सेवा दिली जाते.

(२) वैद्यकीय अधिक्षक यांची बदली झाल्यामुळे दि. २५.१०.२०२३ पासून सदर पद रिक्त झाले आहे. परंतु वैद्यकीय अधिक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांना देण्यात आलेला आहे.

वैद्यकीय अधिकारी यांची ३ पदे मंजूर असून नियमित नियुक्तीने कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांनी स्वेच्छा सेवानिवृत्ती दिल्यामुळे सदरचे एक पद दि. ०३.१०.२०२३ पासून रिक्त आहे. उर्वरित २ पदांवर ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी तत्वावर नियुक्तीने वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.

दंतशल्यचिकित्सक, गट-ब चे १ पद भरलेले असून त्यांचेमार्फत रूग्णांना दंततपासणी सुविधा देण्यात येते. गट-क व गट-ड मधील कर्मचाऱ्यांची एकूण २१ पदे मंजूर असून ८ पदे भरलेली असून १३ पदे रिक्त आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे शहरातील अंगणवाडयांची संख्या वाढविणेबाबत

**(४५) ७७११६ (२९-०२-२०२४). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरात झोपडपट्टीचे व लोकसंख्येचे प्रमाण जास्त असून येथे सद्यस्थितीत अंगणवाडयांची संखया कमी असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुळे शहरात अंगणवाडयांची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (०३-०४-२०२४) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असल्यामुळे केंद्र शासनाच्या सूचनांप्रमाणे व मान्यतेने योजना राबविण्यात येते. अंगणवाडी केंद्राच्या संख्येमध्ये वाढ करण्याकरिता केंद्र शासनाची मान्यता आवश्यक आहे. राज्यात नवीन अंगणवाडी सुरू करण्यासंदर्भात केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन सुधारित प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे. केंद्र शासनाकडून राज्यात नवीन अंगणवाडी केंद्र मंजूर झाल्यास पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोरोना काळात अनाथ झलेल्या मुला-मुलींना बालसंगोपन योजनेअंतर्गत मिळणाऱ्या निधीबाबत

**(४६) ७७१३८ (०१-०३-२०२४). डॉ.राजेंद्र शिंगणे (सिंदखेड राजा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), डॉ.किरण लहामटे (अकोले) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना संसर्गाच्या काळात एक किंवा दोन्ही पालकांचे छत्र हरपलेल्या मुला-मुलींना शासनाच्या वतीने बालसंगोपन योजनेंतर्गत देण्यात येणारे रुपये १,१०० अनुदान माहे जानेवारी, २०२३ पासून देण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनुदानात शासनाने दरमहा रुपये १,१०० वरुन रुपये २,२५० एवढी वाढ केलेली आहे तथापि ही वाढ सुध्दा अद्याप या अनाथ मुलांना देण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत तसेच सदर अनुदान अनाथ मुला-मुलींना त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**कुमारी आदिती तटकरे (२२-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही,

माहे मार्च, २०२३ अखेर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेच्या लाभार्थ्यांना लाभाची रक्कम अदा करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही,

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये वाढीव अनुदानाप्रमाणे अर्थसंकल्पीत करण्यात आलेले ₹१९०९७.४३ लक्ष इतका निधी सन २०२३-२४ या वित्तीय वर्षातील बालसंगोपन योजनेच्या लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आला आहे.

(३) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्यामार्फत या योजनेंतर्गतच्या सर्व पात्र लाभार्थ्यांना लाभाची रक्कम अदा करण्यासाठी शासनाकडून अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामीण महिला सक्षमीकरणाकरिता महिला बचत गटांच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांचे गणवेश तयार करण्याकरिता शिलाई क्लस्टर विकसित करण्याबाबत

**(४७) ७७३४२ (२९-०२-२०२४). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण महिला सक्षमीकरणाकरिता बचत गटाच्या माध्यमातून लातूर जिल्ह्यामध्ये बांबू क्लस्टर व कोल्हापूर जिल्ह्यामध्ये कोल्हापूरी चप्पल क्लस्टर विकसित करण्याबाबत अर्थसंकल्प सन २०२३-२४ मध्ये जाहीर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांबू व कोल्हापूरी चप्पल क्लस्टरच्या धर्तीवर ग्रामीण महिला सक्षमीकरणाकरिता महिला बचत गटांच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांचे गणवेश तयार करण्याकरिता शिलाई क्लस्टर विकसित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीं यांनी मा.मुख्यमंत्री यांना विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), बांद्रा (पूर्व), मुंबई यांना दिनांक ६ एप्रिल, २०२३ रोजी शासन पत्रान्वये शिफारशींसह परिपूर्ण अहवाल शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने कळवून ६ महिन्यांचा कालावधी होऊनही व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), बांद्रा (पूर्व), मुंबई यांनी अद्याप शासनास अहवाल सादर केले नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, ग्रामीण महिला सक्षमीकरणाकरिता महिला बचत गटांच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांचे गणवेश तयार करण्याकरिता शिलाई क्लस्टर विकसित करण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (२९-०४-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी शासन पत्र दिनांक ०६.०४.२०२३ अन्वये महिला आर्थिक विकास महामंडळाकडून अहवाल मागविण्यात आला होता. सदर अहवाल प्राप्त झाला आहे.
(५) सदर प्रस्तावास जिल्हा नियोजन समितीची मान्यता घेऊन रामटेक येथे महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत शिलाई क्लस्टर विकसीत करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. तथापि, पारशीवनी तालुक्यात माविमचे बचत गट नसून तेथे ग्राम विकास विभागाने उमेद अभियानांतर्गत बचत गटांची निर्मिती केली आहे. त्यामुळे सदर क्षेत्रामध्ये माविम मार्फत शिलाई क्लस्टर करणे व्यवहार्य होणार नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळंब,राळेगाव (जि.यवतमाळ) येथील “आपला दावाखाना” मार्फत नागरिकांना सोयी सुविधा मिळणेबाबत**

**(४८) ७७७८७ (११-०३-२०२४). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळंब,राळेगाव (जि.यवतमाळ) परिसरामध्ये एम्पोरियम इनोव्हेशन प्रा. लि.कंपनी मार्फत “आपला दावाखाना” (आरोग्यवर्धीनी) येथे खाजगी कर्मचारी यांची नेमणूक करण्यात येत असून सदर कंपनी खाजगी कर्मच्या-यास एक महिन्यानंतर कामावरुन काढून टाकणे आणि दवाखान्यात व्यवस्था नसणे अशा अनेक तक्रारी नागरिक करीत असल्याचे दिनांक ३१ ऑगस्ट २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे काय,
(२) असल्यास, येथे “आपला दवाखाना” सुरू झाल्यानंतर १५ ते २० दिवस सुरळीत व्यवस्था होती परंतु एम्पोरियम इनोव्हेशन प्रा. लि.कंपनीकडून कर्मचारी काढणे, नवीन भरणे असे प्रकार सुरु केल्याने सदर दवाखाना बंद राहत असल्याने नागरिकांना आरोग्य सुविधा मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२७-०३-२०२४) :**(१) हे अंशत: खरे आहे,

शासनाच्या निर्देशानुसार यवतमाळ जिल्ह्यास ११ “हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना” मंजूर असून कार्यान्वित करण्यात आलेले आहे. शासनाच्या निर्देशानुसार सदर दवाखान्यांकरिता आवश्यक मनुष्यबळा पैकी सफाई कर्मचारी व परिचर हे पद बाह्यस्रोत संस्थेमार्फत पुरविण्यात येते. यवतमाळ जिल्ह्याकरीता मे. एम्प्रोलियम इनोव्हेशन प्रा.लि नांदेड या संस्थेची निविदे व्दारे निवड करण्यात आलेली असुन सदर संस्थे मार्फत नमुद पदा करीता कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात येत असुन सदर मनुष्यबळ नियुक्तीचे प्रक्रिये मध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ या कार्यालयाचा

कोणत्याही प्रकारे सहभाग नाही. तसेच तालुका कळंब व राळेगांव जि यवतमाळ येथील “हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना” (आरोग्यवर्धिनी) येथील दवाखान्यात व्यवस्था नसल्याबाबत नागरिकांची कोणतीही तक्रार जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ या कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(२) हे खरे नाही मे. एम्प्रोलियम इनोव्हेशन प्रा.लि नांदेड या कंपनीव्दारे परिचराची नियुक्ती करणे व सेवा समाप्ती केल्याने दवाखाना बंद राहीला नाही. सदर ठिकाणी १ वैद्यकिय अधिकारी, १ अधिपरिचारिका व १ आरोग्य सेवक यांची नियुक्ती केलेली आहे, त्यामुळे नागरिकांना आरोग्य सेवा सुरळीत पुरविण्यात येत आहे.

(३) तालुका आरोग्य अधिकारी राळेगाव व कळंब यांनी केलेल्या चौकशी नुसार व जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ यांनी सादर केल्यानुसार आपला दवाखाना नियमित चालु असुन रुग्णांना सेवा देत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाढोणा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील जलजीवन मिशन योजनेंतर्गत पाणी पुरवठा योजनेची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(४९) ७८३५३ (२९-०२-२०२४). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाढोणा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील जलजीवन मिशन योजनेअंतर्गत पाणी पुरवठा योजनेची नवीन पाईपलाईन टाकणे, टाकीचे बांधकाम करणे इत्यादी मंजूर कामांच्या निविदेस एक वर्षाचा कालावधी होऊनही कामे प्रलंबित असल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदाराने पाण्याचा स्त्रोत न पाहता आणि टाकीचे बांधकाम न करता गावामधील सिमेंट रस्ते खोदून पाईप लाईन टाकण्याचे काम पावसाळा असताना केल्यामुळे गावामध्ये जागोजागी पाणी व चिखल साचल्याने नगारिकांचे आरोग्य धोक्यात आले असून कंत्राटदाराने सदर कामाचे देयक काढले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने सदर मंजूर योजनेच्या कामास एक वर्षाचा कालावधी उलटून गेल्यानंतरही कामे पूर्ण न झाल्याप्रकरणी शासनाने संबंधीत कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१४-०६-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे, वाढोणा (ता.केळापूर जि. यवतमाळ) योजनेला दि.२१.११.२०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने योजनेची कामे सूरू करण्यात आलेली असून, उद्भव विहीरीच्या जागेचे दानपत्र उपलब्ध न झाल्यामुळे भूवैज्ञानिकांनी नविन विंधन विहीर प्रस्तावित केली. तसेच ग्रामपंचायतीने उंच टाकीची जागा विलंबाने निश्चित करून दिली. ग्रामपंचायतीने दि.१०.१.२०२४ रोजी उंच टाकीची जागा निश्चित करून दिल्यामुळे सद्यस्थितीत सदर कामे आणि वितरण व्यवस्थेची कामे सुरू असुन, योजना प्रगतीपथावर आहे.

(२) व (३) हे खरे नाही, योजनेमध्ये वितरण व्यवस्थेची कामे करतांना नागरीकांचे आरोग्य लक्षात घेऊन, खोदण्यात आलेल्या नाल्या पाईप टाकून सुव्यवस्थित बुजवण्यात आलेल्या आहेत. योजनेची उद्दीष्ट्ये पूर्ण करण्यासाठी सदर योजनेस दिनांक ३०.९.२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली असून, सदर योजनेत कंत्राटदारास केलेल्या कामाबाबत कोणतीही देयके अदा करण्यात आलेली नसल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्यातील उल्हासनगर येथील मध्यवर्ती रुग्णालयातील**
**जिल्हा शल्यचिकित्सक यांची बदली होण्याबाबत**

**(५०) ७८४२६ (११-०३-२०२४). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर-३ येथील मध्यवर्ती रुग्णालयातील जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कुठल्याही बाबींवर नियंत्रण नसून याबाबत वारंवार तक्रारी प्राप्त होत असून जिल्हा शल्यचिकित्सक यांची सदर ठिकाणहून बदली करावी अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा. आरोग्य मंत्री यांच्याकडे दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर रुग्णालयात कुठल्याही प्रकारची साफ सफाई होत नसल्याच्या तक्रारीसुद्धा येत असल्याचे निदर्शनास येत आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णालयातील उक्त बाबीसंदर्भात लोकप्रतिनधी यांनी माहिती मागतिली असता ती वेळेवर दिली जात नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१७-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांना सदर रुग्णालयाचे श्रेणीवर्धन /बांधकाम व एन. एच. एम. इ. बाबतची माहिती वेळेवर सादर करण्यात आलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.